**<u>ठळक बातम्या</u>**

- धर्मेंद्र प्रधान यांच्याकडून केंद्रीय शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा
- सरकारनं सर्व मागण्या मंजूर करण्याचं आश्वासन दिल्यानंतर कॉकरोच जनता पार्टीकडून आंदोलन मागे
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या मन की बात द्वारे देशवासियांशी संवाद साधणार
- गेल्या २ दिवसात पावसामुळं झालेल्या विविध दुर्घटनांमध्ये गुजरात इथं ३५ जणांचा मृत्यू
- रोमानिया दौऱ्यावरून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू मायदेशी रवाना

आणि

- झिम्बॉब्वेविरुद्धच्या दुसऱ्या टी-ट्वेंटी सामन्यातही भारतीय संघ विजयी

<><><><><>

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज दुपारी पदाचा राजीनामा दिला. हा राजीनामा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे पाठवल्याचं त्यांनी समाज माध्यमांवरच्या संदेशात जाहीर केलं.

गेल्या १० दिवसात देशात सुरू असलेल्या घडामोडी दुःखद आहेत. कायदेशीर अडचणींमध्ये न फसता विद्यार्थ्यांनी शिक्षणावर, करियरवर लक्ष केंद्रित करावं यासाठी हा राजीनामा दिल्याचं त्यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे. युवक हीच देशाची खरी ताकद आहे आणि संभ्रमात आणणाऱ्या कुठल्याही दुष्टचक्रात त्यांना अडकू देणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

नीट परीक्षेच्या संदर्भातली सगळी जबाबदारी मी पहिल्या दिवसापासून घेतली. पेपर फोडणाऱ्यांमुळं कुठल्याही प्रज्ञावान विद्यार्थ्याची मेहनत वाया जाऊ नये यासाठी अथक प्रयत्न केल्याचं ते म्हणाले. १६ जुलै रोजी जाहीर झालेल्या नीट परीक्षेच्या निकालात अनेक गरीब आणि प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना चांगलं यश मिळालं. मात्र तरीही महत्त्वाच्या पदावरच्या काही व्यक्तींनी यात अडथळे आणण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केलं.

**<><><><><>**

सरकारनं सर्व मागण्या मान्य करण्याचं आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेत असल्याची घोषणा कॉकरोज जनता पार्टीनं आज नवी दिल्लीत केली.

केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा तसंच जितेंद्र सिंग यांनी आज सीजेपीच्या सौरव दास आणि आशुतोष रांका यांच्यासोबत चर्चा केली. त्यानंतर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत आंदोलन मागे घेत असल्याची घोषणा कॉकरोज जनता पार्टीनं केली.

**- - होल्ड - सीजेपी - -**

आंदोलनकर्त्यांच्या विरोधात असलेले FIR मागे घेणं तसंच नीट परीक्षा रद्द झाल्यानंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना विद्यमान नियमानुसार आर्थिक मदत देण्याची तयारीही सरकारनं दाखवली आहे.

**- - होल्ड- नड्डा - - -**

आंदोलनकर्त्यांनी शिक्षण क्षेत्रातल्या सुधारणांविषयीच्या मागण्यांचं निवेदनसुद्धा सरकारला सादर केलं आहे. त्यावर झालेल्या प्रगतीची माहिती ४ आठवड्यात देऊ, असं आश्वासन सरकारनं दिलं आहे.

**<><><><><>**

टीईटी अर्थात महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणातले मुख्य आरोपी विजेंद्र कुमार गुप्ता आणि इंद्रजीत सिन्हा यांना भिवंडी न्यायालयानं ३० जुलैपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या दोघांना आज बिहार समस्तीपूर इथून अटक करण्यात आली. या प्रकरणातील एकूण अटक आरोपींची संख्या आता १४ वर पोहोचली आहे. आग्रा येथील ‘महीम पत्रण’ छापखान्यातील कर्मचाऱ्यांकडून त्यांनी पेपर विकत घेतल्याची माहिती मिळाली असून याबाबत अधिक तपास सुरु असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं आज छत्तीसगड लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष तमन सिंग सोनवानी यांना एका पेपरफुटीप्रकरणी आर्थिक गैरव्यवहारांच्या आरोपाखाली अटक केली. २०२० आणि २०२१ मधे छत्तीसगड लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतील पेपरफुटी आणि गैरव्यवहारासंबंधी त्यांची चौकशी सुरू होती.

त्यांना ईडीनं चौकशीनंतर अटक केली होती.

**<><><><>**

देवशयनी आषाढी एकादशी निमित्तानं पंढरपुरात आज पहाटे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. यंदाचे मानाचे वारकरी धाराशिव जिल्ह्यातील बाबासाहेब माने आणि प्रभावती माने यांनीही मुख्यमंत्र्यांसोबत विठूरायाची पूजा केली.  विठुरायाच्या दर्शनासाठी दरवर्षी वाढणारी भक्तांची गर्दी पाहता त्यांना उत्तम सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर परिसर विकासाचं काम ‘पंढरपूर कॉरिडॉर’च्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या कॉरिडोरचं काम करताना कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही, सर्वांचं योग्य पुनर्वसन केलं जाईल, अशी ग्वाही देखील मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

- ***- होल्ड - बाईट मुख्यमंत्री- - -***

- **<><><><>**

मुंबईत वांद्रे इथलं रंगशारदा हॉटेल आणि प्रभादेवी भागातल्या एका मालमत्तेवर ईडीनं आज टाच आणली. सध्या या मालमत्ता रंगशारदा हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या ताब्यात आणि नियंत्रणात असून त्यांची एकूण किंमत ३३२ कोटी २४ लाख रुपये आहे.

म्हाडानं केवळ मराठी रंगभूमी, साहित्य आणि सांस्कृतिक उपक्रमांना चालना देण्यासाठी सवलतीच्या दरात रंगशारदा प्रतिष्ठानला या मालमत्ता दिल्या होत्या. मात्र प्रभुदास वीरचंद लोटिया यांनी रंगशारदा हॉटेल्सच्या माध्यमातून या जमिनीवर बेकायदा ताबा मिळवून अटींचं उल्लंघन करत तिचा व्यावसायिक वापर केला, असा आरोप रंगशारदा प्रतिष्ठानच्या विश्वस्तांनी दाखल केलेल्या तक्रारीत केला होता.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमाद्वारे देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३६ वा भाग आहे. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, News on air वेबसाइट, न्यूज ऑन एआयआर मोबाइल ॲपवर होईल. याशिवाय एआयआर न्यूज, डीडी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय तसेच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यू ट्यूब वाहिन्यांवर कार्यक्रमाचे लाइव्ह प्रक्षेपण करण्यात येईल.

<><><><><>

गेल्या २ दिवसात पावसामुळं झालेल्या विविध दुर्घटनात गुजरातमध्ये ३५ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यातले २९ मृत्यू वलसाड आणि नवसारी या जिल्ह्यात झाले आहेत. अतिवृष्टीमुळं निर्माण झालेली पूरपरिस्थिती आता ओसरू लागली असल्यानं प्रशासनानं पुरामुळं झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्याचं काम सुरू केलं आहे.

<><><><><>

रोमानिया दौऱ्यावरून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज दुपारी नवी दिल्लीला रवाना झाल्या. रोमानियाचे राष्ट्राध्यक्ष निक्यूसोर डॅन आणि इतर नेत्यांशी झालेल्या संवादातून दोन्ही देशांमधले परस्पर संबंध एका नव्या उंचीवर नेण्याबाबत दृढ वचनबद्धता प्रतीत होत असल्याचं त्यांनी सांगितलं. मुर्मू यांनी रोमानियाचे प्रधानमंत्री तसंच इतर नेत्यांची भेट घेतली तसंच भारत रोमानिया व्यापारी मंच आणि भारतीय समुदायाशी संवाद साधला. दोन्ही देशांमधल्या वाढत्या भागीदारीसाठी या समुदायानं महत्वपूर्ण स्तंभाची भूमिका निभावल्याचं त्या म्हणाल्या. भारत आणि रोमानिया या देशांमधल्या सहकार्याची व्याप्ती व्यापार, संरक्षण, नवीकरणीय ऊर्जा, डिजिटल तंत्रज्ञान, शिक्षण, संशोधन, वैद्यकीय सुविधा, विज्ञान आणि तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवोन्मेष आणि प्रगत उत्पादन यासारख्या अनेक क्षेत्रात वृद्धिंगत होत असल्याचं मुर्मू यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकेनं भारताकडून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवरचं प्रस्तावित अतिरिक्त शुल्क १२ पूर्णांक ५ दशांश टक्क्यावरून कमी करून १० टक्के केलं आहे. युनायटेड स्टेट्स ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह अर्थात यू-एस-टी-आरनं अमेरिकन व्यापार कायद्याअंतर्गत भारताला कमी शुल्काच्या श्रेणीत ठेवल्यामुळे भारतीय उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक फायदा मिळणार आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं आज नवी दिल्लीत ही माहिती दिली.

भारताकडून अमेरिकेला होणारी जवळपास ४५ टक्के निर्यात या अतिरिक्त शुल्काच्या कक्षेबाहेरच राहणार आहे. यामध्ये सध्या शून्य टक्के अतिरिक्त शुल्क लावलं जाणारी जेनेरिक औषधे, स्मार्टफोन आणि काही इतर वस्तूंचा समावेश असून त्यांच्यावर हे नवीन १० टक्के शुल्क लागू होणार नाही. याशिवाय पोलाद, ॲल्युमिनियम आणि वाहनांचे सुटे भागयांवरही हे शुल्क आकारलं जाणार नाही.

**<><><><><>**

झिम्बॉब्वे विरुद्धची टी-ट्वेंटी मालिका भारतीय संघानं २-० अशी जिंकली आहे. या मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात आज भारतानं झिम्बॉब्वेवर ९० धावांनी मात केली. पहिल्या सामन्यात भारतानं ७ गड्यांनी विजय मिळवला होता. या मालिकेतला तिसरा सामना उद्या होणार आहे.

आजच्या सामन्यात झिम्बाब्वेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं २० षटकांत ५ बाद २१९ धावा केल्या. भारतातर्फे ईशान किशननं ८१ तर तिलक वर्मानं नाबाद ६० धावा केल्या.

झिम्बॉब्वेचा संघ मात्र १८ व्या षटकात १२९ धावांवर सर्वबाद झाला. अभिषेक शर्मानं ३ तर यश ठाकूर आणि प्रिन्स यादव यांनी प्रत्येकी २ गड़ी टिपले.

//<><><><><>//